निगराणी

# तूर पिकावरील किडींना अटकाव



प्रा. एस.डी. सपकळ
(मो.नं. ७०२०६४७३२२)
एस.एस. चव्हाण
बी.जे. चोपडे
कृषी कीटकशास्त्र विभाग,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण
कृषी विद्यापीठ, दापोली



तूर हे खरीप हंगामातील पीक असले तरी ते रब्बी हंगामात पक्व होते. तसेच त्यामध्ये प्रथिनांचे प्रमाणही अधिक असल्यामुळे, या पिकावर खरीप तसेच रब्बी हंगामातील किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. तुरीमध्ये १०० टक्के फुलधारणा होत असली तरी फक्त १० टक्के फुलांनाच फळधारणा होत असते. तुरीमध्ये फुले व शेंगांवर होणाऱ्या किडींचे प्रमाण जास्त असल्यामुळे तुरीच्या उत्पन्नात विक्रमी घट येत असते.

तूर हे एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. महाराष्ट्रात लागवड होत असलेल्या विविध कडधान्ये पिकांमध्ये सर्वाधिक जास्त क्षेत्र तूर या पिकाखाली आहे. तूर हे खरीप हंगामातील पीक असले तरी ते रब्बी हंगामात पक्व होते. तसेच त्यामध्ये प्रथिनांचे प्रमाणही अधिक असल्यामुळे, या पिकावर खरीप तसेच रब्बी हंगामातील किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. तुरीमध्ये १०० टक्के फुलधारणा होत असली तरी फक्त १० टक्के फुलांनाच फळधारणा होत असते. तुरीमध्ये फुले व शेंगांवर होणाऱ्या किडींचे प्रमाण जास्त असल्यामुळे तुरीच्या उत्पन्नात विक्रमी घट येत असते. योग्य वेळी किडींचे नियंत्रण करण्यासाठी शेतकऱ्यांना तुरीवर येणाऱ्या किडी व त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन यांची माहिती असणे आवश्यक आहे.

तूर पिकावरील महत्त्वाच्या किडी अशा आहेत

१) **तुरीवरील शेंगा पोखरणारी अळी** : ही अळी एक बहुभक्षी कीड असून भयंकर नुकसानकारक आहे. अळी हिरव्या रंगाची असून हिरवी अमेरिकन बोंडअळी, घाटेअळी आदी नावांनी ओळखली जाते. सुरुवातीला अंड्यातून बाहेर पडलेली अळी कोवळी पाने व देठावर उपजीविका करत असते. नंतर शेंगांना अनियमित आकाराचे छिद्र पाडून आत व बाहेर राहून दाणे खाते. एक अळी सर्वसाधारणपणे १०-१५ तुरीच्या शेंगांचे नुकसान करते.

२) **तुरीवरील पिसारी पतंग** : ही अळी हिरवट रंगाची असून मध्यभागी फुगीर व दोन्ही बाजूंना निमुळती असते. तसेच पाठीवर काटेरी लव असते. कोष लालसर तपकिरी



रंगाचे असून अळीसारखेच दिसतात. या किडींचा पतंग नाजूक, निमुळता १२.५ मि.मी. लांब करड्या भुऱ्या रंगाचा असतो. पुढील पंख लांब पसरट आकाराचे असल्यामुळे त्यांना पिसारी पतंग म्हणतात. लहान अळी कळ्या, फुले व शेंगांना छिद्र पाडून त्यावर उपजीविका करते तर मोठी अळी शेंगांची साल खरडून तिला छिद्र पाडते व बाहेर राहून आतील दाणे खाते. ही अळी आतमध्ये कधीच शिरत नाही. ही अळी पावसाळा संपल्यानंतर तुरीवर मोठ्या प्रमाणात दिसून येते आणि हळूहळू तिचा प्रादुर्भाव वाढून मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

३) **तुरीवरील शेंगमाशी** : ही तुरीवरील एक महत्त्वाची कीड असून जवळपास ८० टक्क्यांपर्यंत नुकसान करते. अळी पांढऱ्या रंगाची, पारदर्शक व गुळगुळीत असून तिला पाय नसतात. अळी सुरुवातीच्या काळात दाण्याचा पृष्ठभाग पोखरते त्यामुळे दाण्यावर नागमोडी आकाराच्या खाचा तयार झालेल्या दिसतात आणि नंतरच्या काळात ती दाण्यावर उपजीविका करते. बाहेरुन पाहिल्यास शेंगांवर कोणताही प्रादुर्भाव दिसून येत नाही. कोषावस्थेत जाण्यापूर्वी बाहेर पडण्यासाठी अळी शेंगांना छिद्र पाडते तेव्हा नुकसानीचा प्रकार लक्षात येतो. तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीप्रमाणेच शेंगमाशीही पिकाचे सर्वात जास्त नुकसान करते.



४) **तुरीवरील पाने गुंडाळणारी अळी** : ही अळी हिरवट पांढऱ्या रंगाची असून तिच्या शरीराच्या दोन्ही बाजूस चामखिळीसारखे काळे ठिपके असतात. ही अळी कोवळे शेंडे, पाने, फुलकळ्या आणि शेंगा एकत्र करुन त्यांचा गुच्छ तयार करते आणि त्याच्या आतमध्ये राहून उपजीविका करते. कोवळे शेंडे, पाने, फुलकळ्या आणि शेंगा एकमेकांना चिकटल्यामुळे शेंगांचे प्रमाण कमी होऊन उत्पादनात घट होते. कमी कालावधीमध्ये पक्व होणाऱ्या जाती या अळीस विशेष बळी पडतात. तसेच जास्त आर्द्रता असलेल्या भागात या किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

## तूर पिकाचे एकात्मिक कीड व्यवस्थापन

१) सुरुवातीला मशागतीय नियंत्रण करणे गरजेचे आहे. त्यामुळे उन्हाळ्यात जमिनीची खोलवर मशागत करावी.

त्याचबरोबर जैविक कीटकनाशकांची बीजप्रक्रिया करावी, सापळा पिके लावावीत.

२) पिकावरील पाने खाणाऱ्या, शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांच्या नियंत्रणासाठी कार्यप्रणालीय नियंत्रण ही प्रभावी पद्धत आहे. यामध्ये कीडग्रस्त पाने, पानावरील बारीक अळ्या लहान असताना पानासकट गोळा करुन केरोसिनमिश्रित पाण्यात टाकून माराव्यात. तसेच किडीचा प्रादुर्भाव होणाऱ्या शेंगा गोळा करुन जाळाव्यात जेणेकरुन आतमधील अळी मरुन पुढील नुकसान कमी होईल.

३) शेंगा पोखरणाऱ्या हिरव्या अळीचे सर्वेक्षण व काही प्रमाणात नियंत्रण करण्यासाठी हेक्टरी १० कामगंध सापळे पिकात उभे करावेत.

४) प्रतिहेक्टरी ५० पक्षीथांबे शेतात उभारावेत, त्यामुळे पक्षी किडींच्या अळ्या खातील.

५) तुरीच्या झाडाखाली पोती टाकून झाड हलवावे म्हणजे झाडावरील अळ्या खाली पोत्यावर पडतील, नंतर त्या गोळा करुन नष्ट कराव्यात.

६) जैविक कीडनियत्रंण ही पर्यावरणासाठी सुरक्षित व दीर्घकाळ काम करणारी उत्कृष्ट कीडनियंत्रण पद्धत आहे. यामध्ये शेंगा पोखरणारी अळी म्हणजे घाटेअळीच्या नियंत्रणासाठी एन.ए.एन.पी.व्ही. या अळीचे विषाणू प्रतिहेक्टर २५० मि.लि. फवारावे.

**कीटकनाशक फवारणीचा तक्ता**

| अ. क्र. | फवारणी | कीटकनाशके | प्रमाण/ प्रती १० लि. पाणी |
|---|---|---|---|
| १ | पहिली फवारणी | निंबोळी अर्क ५ टक्के+ लाम्डासायहेलोथ्रिन ५ टक्के ई.सी. | ४ मि.लि. |
| २ | दुसरी फवारणी | एथिओन ५० टक्के ई.सी. किंवा फ्लुबेंडामाईड ३९.३५ टक्के ई.सी. | ३ मि.लि.<br>४ मि.लि. |
| ३ | तिसरी फवारणी | स्पिनोसॅड ४५ टक्के ई.सी. किंवा इमामेक्टिन बेन्झोएट ५ एस.सी. | ४ मि.लि.<br>३ ग्रॅम |

**टीप** : १) शेंगमाशीच्या नियंत्रणासाठी दुसऱ्या व तिसऱ्या फवारणीसोबत डायमिथोएट ३० ई.सी. ११ मि.लि. किंवा ट्रायोफॉस ४० ई.सी. २० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी. २) पहिली फवारणी पिकास फुलकळी येऊ लागताच तर दुसरी फवारणी पीक ५०% फुलोऱ्यात आले असताना आणि तिसरी फवारणी दुसऱ्या फवारणीच्या १५ दिवसांनी करावी. रासायनिक कीटकनाशकांचा वापर पट्टा पद्धतीने केल्यास परोपजीवी किडींचे संरक्षण होऊन उपद्रवी किडींचा नाश करण्यास मदत होते. वरील पद्धतीने एकत्रितरित्या कीड व्यवस्थापनाच्या पद्धतीचा वापर केल्यास तूर पिकावरील किडींचे योग्य वेळी नियंत्रण होते. त्यामुळे आर्थिक नुकसान टाळता येते. ■


## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).

email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**